**शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत विशेष मोहिम**

# महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : जमीन ०३/२०१०/प्र.क्र.४०/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २९ जून, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दि.२८.११.१९९१.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.२२.४.१९९२.
३) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९२/प्र.क्र.६५/ज-१, दि.१६.१२.१९९८.
४) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०९८/१५/प्र.क्र.४६/ज-१, दि.२३.३.१९९९.
५) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०/२००१/प्र.क्र.२२२/ज-१, दि.१४.८.२००१.
६) शासन अर्ध शासकीय पत्र समक्रमांक दि.४.१२.२००४.
७) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एलईएन १०/२००४/प्र.क्र.४९/ज-१, दि.९.३. २००७.
८) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक : एलईएनल १०/२००४/प्र.क्र.४९/ज-१ दि.४.१२.२००८

**शासन परिपत्रक :-**

शासकीय पड / गायरान जमिनीवरील दि.१.४.१९७८ ते दि.१४.४.१९९० या कालावधीत शेतीसाठी झालेली व दि.१४.४.१९९० रोजी अस्तित्वात असलेली आणि शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन परिपत्रक दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या अतिक्रमणदारांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या सूचना दि.१६.१२.१९९८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन परिपत्रक दि.२३.३.१९९९ अन्वये शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्याना कळविण्यात आलेले होते. दि. ९ मार्च, २००७ च्या परिपत्रकान्वये सदर कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच दि. ४.१२.२००८ च्या परिपत्रकान्वये सदर कार्यवाही सहा महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि बहुतांश जिल्ह्यात उपरोक्त कालावधीमधील नियमानुकूल करण्याबाबतची बरीच प्रकरणे अद्यापि प्रलंबित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब, दि.४.१२.२००८ मधील आदेशानुसार कार्यवाही करण्यासाठी सदर आदेशाच्या दिनांकापासून तीन महिने मुदत देण्यात येत आहे. सदर मुदतीत काटेकोर कार्यवाही करुन पात्र अतिक्रमणे नियमित करण्याची व अपात्र ठरणारी अतिक्रमणे निष्कासीत करुन शासकीय जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही पूर्ण होईल याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावी व कार्यवाही पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे, पुढीलप्रमाणे कार्यवाही

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.
12 JUL 2010
विशेष नोंद
कार्यविवरण क्र. १३४३[ ५००-७-१०]

२. शासन निर्णय दि.२८.११.१९९१ व शासन निर्णय दि.२२.४.१९९२ मधील अटी व शर्तीनुसार शासकीय पड / गायरान जमिनीवरील शेतीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही अद्याप पूर्ण

19 JUL 2010

[कृ. मा. प.

झालेली नाही अशा प्रकरणी खास मोहिम काढून तीन महिन्याच्या आत अशी प्रकरणे कालबध्द रितीने निकाली काढण्याच्या दृष्टीने पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा :-

(i) ही मोहिम संपूर्ण राज्यात दि.२९.६.२०१० पासून सुरु करण्यात यावी.

(ii) सदर मोहिमेंतर्गत तालुका स्तरावर विशेष शिबिरे घेण्यात यावीत.

(iii) सदर मोहिमेस तालुका, मंडळ व सजा स्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(iv) सदर मोहिमेकरीता आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांनी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे.

(v) सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित प्रकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीचा मासिक बैठकांत आढावा घ्यावा.

(vi अपात्र ठरणारी व नियमानुकूल न होऊ शकणारी अतिक्रमणे तातडीने काढून टाकून सदर जमिनींचा ताबा घेण्यात यावा व सदर जमिनींवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करावी.

३. वरील आदेशानुसार परिणामकार व कालबध्द रितीने कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(राजेंद्र सुर्वे)
उप सचिव,
महसूल व वन विभाग

**प्रत :** सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व उप विभागीय अधिकारी
सर्व तहसिलदार.
मा. मंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खासगी सचिव.
अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक.
इतर मंत्रालयीन विभाग.
'ज' समुहातील सर्व उपसचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग निवडनस्ती

---------